


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २७ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## चटके दिलेल्या 'त्या' बाळाला पुढील उपचारासाठी नागपूर रेफर

### ...तर बाळाच्या आईवर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

भोंदु तांत्रिकाचा सल्ला ऐकूण एका २२ दिवसाच्या हृदयाच्या आजाराने त्रस्त असलेल्या आजारी बाळाच्या पोटाला ६५ चटके दिल्याची घटना उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत चिखलदरा पोलिसांचे पथक बुधवार २६ फेब्रुवारी रोजी हातरू प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अख्यारित येणाऱ्या सिमोरी गावात दाखल झाले आहे.तर मुलाला पुढील उपचारासाठी नागपूर रवाना करण्यात आले.






पोलिसांनी गावात पोहचताच आरोग्य यंत्रणेतील संबंधित अधिकारी, कर्मचारी, ग्रामसवेक, ग्राम सचिव, आशा वर्कस, सरपंचसह गावातील काही महिला, पुरूषांसोबत पोलिसांनी विचारपूस केली. या तपासात मुलाच्या आईनेच बाळाला गरम सळईने चटके दिल्याचे निष्पन्न झाल्याने बाळाच्या आईविरुद्ध वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तर दुसरीकडे बाळाला इन्फेक्शन झाले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी आज सकाळी पाच वाजताच्या सुमारास पोलीस बंदोबस्तात नागपूरला पाठविण्यात आले.

## मध्यरात्रीच्या भेटीनंतर घडामोडींना वेग; शरद पवाराच्या सर्वात जवळच्या दोन बड्या नेत्यांना सरकारचं मोठं गिफ्ट?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठ यश मिळालं, महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत पुन्हा एकदा राज्यात सत्ता स्थापन केली, मात्र दुसरीकडे या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर महाविकास आघाडीचे अनेक नेते आणि पदाधिकारी महायुतीमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. शिवसेना आणि भाजपमध्ये जोरदार प्रवेश सुरू आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे देखील भाजपच्या



वाटेवर असल्याची चर्चा सुरू आहे, मात्र जयंत पाटील यांनी ही चर्चा फेटाळून लावली आहे.

मात्र दोनच दिवसांपूर्वी जयंत पाटील यांनी मध्यरात्री भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. या भेटीवरून पुन्हा एकदा चर्चेला उधाण आलं. मात्र या भेटीचा कोणताही राजकीय अर्थ काढू नये असं जयंत पाटील यांनी म्हटलं आहे.सांगली जिल्ह्यातले महसूल संबंधित काही प्रश्न होते. त्या संदर्भात निवेदन देण्यासाठी मी बावनकुळे यांची भेट घेतली. माझ्यासोबत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माझा स्टाफ देखील होता. या भेटीमध्ये कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही असं स्पष्टीकरण या भेटीवर जयंत पाटील यांनी दिलं होतं.

मात्र आता या भेटीनंतर हालचालींना वेग आला आहे, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि नेते उत्तम जानकर यांना सरकारकडून पीए देण्यात आले आहेत. या पीएंच्या पगाराचा खर्च देखील सरकारी तिजोरीमधून होणार आहे. त्यामुळे पुन्हा एकदा चर्चेला उधाण आलं आहे. विशेष म्हणजे शरद पवार गटाचे नेते उत्तम जानकर यांनी ईव्हीएमच्या मुद्द्यावर सरकारविरोधात मोठं आंदोलन उभारलं होतं. या आंदोलनामुळे सरकारची डोकेदुखी वाढली असताना देखील त्यांना सरकारी पीए देण्यात आला आहे. यामुळे पुन्हा एकदा चर्चेला उधाण आलं आहे. उत्तम जानकर यांनी ईव्हीएमवर शंका उपस्थित करत यापूर्वीच आंदोलनाचा इशारा दिला आहे. निवडणुका बॅलेट पेपरवर व्हाव्यात अशी त्यांची भूमिका आहे.

## दिव्यांग व्यक्तीला जीवे ठार करून घर बुलडोझरने तोडण्याची धमकी

### कुटुंब हवालदिल : बिल्डरवर कारवाईची मागणी : शेतावर प्लॉट पडण्याचा बिल्डरचा मनसुबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अचलपूर**

प्लॉटला चांगले भाव यावे यासाठी गेल्या ४० वर्षापासून नझुलच्या जागेत राहत असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीला बिल्डरने जीवे ठार करून त्याचे घर बुलडोझरने तोडून टाकण्याची धमकी दिल्याची संतापजनक घटना बिलनपुऱ्यातील संन्यासपेंड रस्त्याजवळ घडली आहे .



प्राप्त माहितीनुसार अचलपूर येथील संन्यास पेंड रस्त्याजवळ सीट नंबर २२ प्लॉट नंबर १६१ /६२ येथे जगतराव पोटे हे एका पायाने दिव्यांग असलेले व आर्थिक दृष्ट्या गरिब असलेले गेल्या ४० वर्षापासून ते व त्यांचा परिवार येथे राहत आहे ते राहत असलेल्या घराच्या पाठीमागे शेत आहे ते शेत मनीभाई कोयलेवाला नामक बिल्डरने घेतल्याची माहिती आहे त्या शेतावर प्लॉट पाडण्यासाठी जगतराव पोटे यांचे घर सर्वात मोठे अडसर ठरत आहे त्यासाठी गेल्या चार ते पाच महिन्यापासून सदर बिल्डर कुरापत काढून पोटे ह्यांना मानसिक त्रास देत असतो काल बुधवारी त्याने पोटे ह्यांना सोबत २ ते ३ गुंड प्रवृत्तीची लोक आणून अश्लिल शिविगाळ करून पोटे ह्यांना जिवे ठार करण्याची धमकी देउन घरावर बुलडोझर चालविण्याची धमकी दिली तसेच दोन दिवस अगोदर त्यांच्या घरासमोर तोडण्यात आलेल्या घराचे मटेरियल जाणून-बुजून टाकले यामुळे पोटे परिवार हवालदिल झाला असून वरिष्ठ अधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष घालून कोयलेवाला व त्याच्या गुंड साक्षीदारांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.या संदर्भात अचलपूर पोलीस स्टेशनशी संपर्कसाधला असता जगतराव पोटे यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली असून अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली असल्याची माहिती देण्यात आली.

> मला काल सदर बिल्डरने माझ्या घरी येऊन मला व्यंगावर बोलून जिवे ठार करण्याची धमकी देऊन माझे घर जेसीबीने तोडून टाकण्याची धमकी दिली वास्तविक तुझ्या शेतावर प्लॉट टाकण्याचे म्हणत आहे त्याचा तो मालक नाही तरीही फक्त भाईगिरीवर तो माझी घर तोडण्याची धमकी देत आहे यासंदर्भात रीतसर पोलीस स्टेशनला तक्रार केलेली आहे माझ्या घरासमोर तुटलेल्या घरांचे मटेरिअल आणून टाकत आहे त्यामुळे आम्ही त्रासून गेलेलो आहोत पोलिसांनी या संदर्भात कडक कारवाई करावी.
>
> **जगतराव पोटे बिलनपुरा अचलपूर**

## स्वारगेट प्रकरणातील फरार आरोपी दत्ता गाडेसाठी पोलिसांचे १ लाखांचे बक्षीस

### गाडे याला अटक करण्यासाठी नागरिकांची मागितली मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७पुणे**

स्वारगेट एसटी स्थानकात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हा प्रकार मंगळवारी (२७ फेब्रुवारी) सकाळी घडला. आरोपी दत्तात्रय रामदास गाडे (वय ३६, रा. शिक्रापूर) याने पीडित तरुणीला धमकावून तिच्यावर अत्याचार केला आणि नंतर पसार झाला.




या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी गाडे हा सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. त्याच्यावर यापूर्वी जबरी चोरीसह सात गुन्हे दाखल आहेत. आरोपीला पकडण्यासाठी पुणेपोलिसांनी आठ पथके तयार केली असून, त्याच्या शोधासाठी मोठ्या प्रमाणावर तपास सुरू आहे.

पुणे पोलिसांनी आरोपी दत्ता गाडे याला अटक करण्यासाठी नागरिकांची मदत मागितली आहे. आरोपीबद्दल माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती मिळाल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी छापे टाकण्यात येत असून, लवकरच त्याला अटक केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.नागरिकांनी कुठल्याही संशयित हालचाली आढळल्यास स्वारगेट पोलीस ठाण्याशी किंवा १०० क्रमांकावर संपर्क साधावा. अशा सूचनाही देण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी सकाळी साडेपाचच्या सुमारास स्वारगेट एसटी स्थानकात आली. ती फलटणला निघाली होती. ती बसची वाट पाहात थांबली असताना गाडेने तिला हेरले. त्याने ताई फलटणची बस येथे लागत नाही, पलीकडे लागते, असे तिला सांगितले. मात्र, पीडितेने मी नेहमीच येथून बसते असे म्हणत पलीकडे जाण्यास नकार दिला. त्यावर त्याने मी इथे गेली दहा वर्षे काम करत आहे, असे सांगून तिचा विश्वास संपादन केला. यानंतर तिला स्वारगेट - सोलापूर शिवशाही बसजवळ नेले. तेथे गेल्यावर तिने बसमध्ये अंधार दिसत असल्याचे सांगितले. यावर गाडेने रात्रीची बस असल्याने प्रवासी लाइट बंद करून झोपले असल्याचे सांगितले. पाहिजे तर मोबाइलची लाइट लावून बघून ये, असे तो म्हणाला. त्याच्यावर विश्वास ठेवत तरुणी बसमध्ये चढली.ही संधी साधत गाडेने मागोमाग येत तिचा गळा आवळला. यानंतर तिला ठार मारण्याची धमकी देत अत्याचार केला. या घटनेने तरुणीला मोठा धक्का बसला होता. तिने खाली आल्यावर एक प्रवाशाला गाडेने केलेल्या कृत्याबद्दल माहिती दिली. मात्र, त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. यानंतर तरुणी काही वेळाने आलेल्या फलटणच्या बसमध्ये बसून निघून गेली.

## वाल्मीक कराडसह ८ आरोपींविरोधात सीआयडी दाखल करणार चार्जशीट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७बीड**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाला आणखी वेग आला असून आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, यासाठी आता यंत्रणांकडून वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. सरपंच हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याच्यासह ८ आरोपींविरोधात सीआयडीकडून बीडमधील विशेष मकोका कोर्टात



आरोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे समजते. तब्बल १४०० पानी आरोपपत्राच्या माध्यमातून आरोपींनी केलेल्या दुष्कृत्याचा लेखाजोखा सीआयडीकडून कोर्टासमोर मांडण्यात येणार आहे.

सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या प्रकरण्यात आली होती. त्यानंतर आरोपी फरार झाले होते. मात्र देशमुख कुटुंबियांसह राज्यभरातील जनतेच्या आक्रोशातून निर्माण झालेल्या दबावामुळे तपासाची चक्रे फिरली अन् काही आरोपी स्वत:हून हजर झाले तर पोलिसांकडून काहींच्या मुसक्या आवळण्यात आल्या. या आरोपींना कोर्टाच्या माध्यमातून कठोर शिक्षा होण्यासाठी यंत्रणांकडून सादर केले जाणारे आरोपपत्र महत्त्वाचे ठरणार आहे. आरोपींनी नेमकी कशा प्रकारे देशमुख यांची हत्या केली, कोणत्या आरोपीची काय भूमिका होती, त्याबाबतचे कोणते पुरावे तपास यंत्रणांकडे आहे, हे आरोपपत्राच्या माध्यमातून स्पष्ट होणार आहे.

## साडेतीन वर्षे काय केलं? सपकाळ यांनी मागितला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडे 'केआरए'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२७मुंबई**

काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ कामाला लागले आहेत. त्यांना नवीन कार्यकारिणी तयार करायची आहे. यासाठी झाडाझडती घेतली जात आहे. याकरिता नाना पटोले यांच्या कार्यकारिणीत सुमारे साडेतीन वर्षे पदाधिकरी असलेल्यांनी काय कामे केली? याची माहिती त्यांच्याकडून मागण्यात आली आहे. हे बघता नवीन कार्यकारिणी करताना कामाच्या लोकांना प्राधान्य दिले जाईल असे दिसते.

सपकाळ यांनी गुगल फॉर्मच्या माध्यमातून सविस्तर माहिती अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहे. पद, कार्यकाळ या दरम्यान केलेली कामे, पार पाडलेल्या जबाबदाऱ्या, संघटनात्मक स्थिती, विशेष कार्य आदीचा लेखाजोखा जुन्या पदाधिकाऱ्यांना सादर करावयाचा आहे. उपाध्यक्ष, सरचिटणीस व सचिव असे सुमारे दोन पदाधिकाऱ्यांची टीम नाना पटोले यांच्या कार्यकारिणीत होती.



हर्षवर्धन सपकाळ यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करून राहूल गांधी यांनी प्रस्थापितांना मोठा धक्का दिला आहे. याकरिता काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते स्पर्धेत होते. भाजपला प्रत्युत्तर देण्यासाठी आक्रमक नेत्याची निवड केली जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. राज्यात सत्ता नसल्याने आर्थिक परिस्थितीचाही विचार केला जाईल, असे बोलले जात होते.

मात्र काँग्रेसने यावेळी संघटनेला प्राधान्य दिले असल्याचे दिसून येते. प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती आणि पदग्रहण साोहळा आटोपल्यानंतर सपकाळ यांनी प्रदेश काँग्रेसची रचना कशी राहील, नवे-जुने आणि नेत्यांच्या समर्थकांचा कसा समतोल साधला जाणार, याची चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर सपकाळ यांनी सोमवारी जिल्हाध्यक्ष व मंगळवारी प्रदेश पदाधिकाऱ्यांची पहिली बैठक घेतली. दोन्ही स्वतंत्र बैठकांमध्ये त्यांनी संघटनात्मक स्थितीचा आढावा घेतला.तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सज्ज होण्याची सूचना केली. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी गुगल फॉर्मच्या माध्यमातून सविस्तर माहिती मागवली असल्याने अनेक निष्क्रिय पदाधिकारी अस्वस्थ झाले आहेत. लोकसभा आणि विधानसभा आटोपल्या असल्याने सपकाळ यांनी आता संपूर्ण लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांवर लक्ष केंद्रीत करण्याची सूचना केली आहे. याकरिता जिल्हाध्यक्ष शेतकऱ्यांचे विषय तर शहराध्यक्षांना आपआपल्या शहरातील प्रश्न घेऊन आंदोलन करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रदेशाध्यक्षांनी तीन मार्चला सर्व जिल्ह्यात आंदोलन करण्यास सांगण्यात आले आहे.




## संपादकीय ......

# मराठी भाषा संवर्धनाचे आव्हान

'ग्रंथात अथवा पुस्तकात राहून भाषा जिवंत राहणार नाही, ती बोलली जाईल, तेव्हाच जिवंत राहील,' असे अतिशय वास्तव उद्गार नवी दिल्लीत पार पडलेल्या अठ्याण्णवव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी काढले आहेत. मराठी साहित्य संमेलन नेहमीप्रमाणे आणि अपेक्षेप्रमाणे थाटामाटात आणि उत्साहात पार पडले. नेहमीचे कार्यक्रम आणि सोपस्कार झाले. अशा साहित्य संमेलनाच्या सोहळ्यातून काय आणि किती साध्य होते, हा प्रश्न बाजूला ठेवला तरी साहित्य क्षेत्रातील सरदार, शिलेदार आणि रसिक वाचक एकत्र येतात, काही आदान–प्रदान होते; पण मराठी भाषेच्या वृद्धी आणि विकासासाठी अशा संमेलनाचा हातभार किती लागतो, याचे उत्तर बहुधा संदिग्धच असेल. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पहिल्याच संमेलनात अध्यक्षा डॉ. भवाळकर यांनी मराठी भाषेच्या विद्यमान स्थितीवर अचूक बोट ठेवले आहे. त्यांचे हे उद्गार औचित्यपूर्ण आहेत शिवाय भावी काळातील मराठी भाषेच्या स्थितीबद्दल इशारा देणारेही आहेत. त्यामुळे त्याची गांभीर्याने दखल घ्यायला पाहिजे.

भाकरी का करपली, घोडा का अडला आणि पान का सडले, या तिन्ही प्रश्नांचे एकच उत्तर येते. ते म्हणजे न फिरविल्याने! म्हणजेच प्रवाही न राहिल्याने. मराठी भाषेची सद्यस्थिती लक्षात घेता, ती प्रवाही राहिली आहे का, याबाबत निश्चितपणाने होकारात्मक उत्तर देणे कठीण आहे. मराठी भाषेतील शब्दसंख्या घटत असल्याचे विदारक वास्तव समोर आले असताना मराठी भाषा समृद्ध आणि अधिक विकसित होत आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरणार आहे.१८५७ मध्ये मोत्सवर्थ यांनी मराठी शब्दकोश तयार केला. त्यात ६० हजार शब्द होते. १९३२ मध्ये मराठी शब्दकोशाचे आठ खंड प्रकाशित झाले. त्यामधील शब्दसंख्या एक लाख ३० हजारांवर होती. बारा वर्षांपूर्वी म्हणजे २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या मराठी शब्दकोशातील शब्दसंख्या १ लाख १३ हजार एवढी होती. १७ हजार शब्दांची घट झाली. म्हणजे सुमारे ८० वर्षांत मराठी भाषेत १३ टक्के शब्दांची घट झाली. मराठी भाषा प्रवाहित असती, तर नवे नवे शब्द प्रचलित होऊन शब्दसंख्या वाढली असती. याचाच अर्थ आपल्या बोलण्यातील आणि रोजच्या वापरातील शब्द कमी होत गेले. मराठी बोलणार्यांची संख्या कमी झाली. डॉ. भवाळकर यांचे निरीक्षण अगदी अचूक आहे, हेच या आकडेवारीतून स्पष्ट होते.

मराठीची शब्दसंख्या कमी होत असताना विज्ञान, तंत्रज्ञानाची भाषा समजली जाणार्या अर्थात ज्ञानभाषा इंग्रजी भाषेची समृद्धी डोळे दीपवणारी आहे. ऑक्सफर्डच्या अलीकडील शब्दकोशात सहा लाख इंग्रजी शब्द आहेत, तर कॉलिन्सच्या शब्दकोशात तब्बल ७ लाख ५० हजार इंग्रजी शब्दसंख्या आहे. इंग्रजीने फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, इटालियन, स्पॅनिश, रशियन अशा युरोपियन भाषांतील शब्द आत्मसात केलेच शिवाय ज्या ज्या देशात इंग्रजांनी वसाहती केल्या, राजवटी स्थापन केल्या, त्या त्या देशातील, प्रांतातील अनेक शब्दही आपल्या भाषेत प्रचलित केले. अरबी, फार्सी, तुर्की, उर्दूसह मराठीतील घेराव, बंदसारख्या शब्दांनी इंग्रजी भाषेची व्याप्ती वाढलेली आहे.

गेल्या ५०–६० वर्षांत आर्थिक, औद्योगिक बदल होत गेले. ग्रामीण भागात फार मोठे संक्रमण झाले. बलुतेदार, अलुतेदार जवळजवळ संपुष्टात आले. सर्वच क्षेत्रात कमी जास्त प्रमाणात स्थित्यंतरे झाली. त्याचा परिणाम ६०–७० वर्षांपूर्वीचे शब्द विस्मरणात आणि अडगळीत जाण्यात झाला. साधे स्वयंपाक घरातील शब्द घ्या. जाते, पाटा–वरवंटा, खलबत्ता, चूल, वैल, घंगाळ, बंब, होन, उखळ, मुसळ, मुगल हे शब्द नव्या पिढीला अपरिचित आहेत आणि जुनी पिढीही ते शब्द विसरत चालली आहे. १९७० च्या दशकापासून गेल्या ५०/६० वर्षांत तंत्रज्ञान आणि विज्ञानाने गरुडझेप घेतली. भारतात १९८० च्या दशकात संगणक युगाचा प्रवेश झाला आणि आता 'एआय'ची महाक्रांती उंबरठ्यावर आहे. या अनुषंगाने या तंत्र विज्ञानाची परिभाषा असलेले इंग्रजी शब्द मराठी भाषेत जसेच्या तसे रूढ झाले आहेत. मोबाईलवर भ्रमणध्वनी असा मराठी प्रतिशब्द असला, तरी तो कोणी वापरत नाही. मोबाईलबरोबर, व्हॉटस्ॲप, यूट्यूब, रिंगटोन असे अनेक शब्द आता लोकांच्या नित्य बोलण्यात आले आहेत. असे नवे शब्द वापरात आले असले, तरी एकूणच मराठी भाषेचा म्हणून दैनंदिन जीवनातील वापर कमी होत चालला आहे.मुंबई महानगरात एकेकाळी म्हणजे संयुक्त महाराष्ट्र लढ्यावेळी मराठी भाषिकांची संख्या ४५ टक्के होती. ती आता २८ टक्क्यांवर आली आहे. महानगर मुंबईत टॅक्सीपासून पानपट्टीपर्यंत, दुकानापासून मॉलपर्यंत आणि साध्या हॉटेलपासून फाईव्ह स्टार हॉटेलपर्यंत हिंदी हीच मुख्य संवादाची भाषा बनली आहे आणि भाजी बाजारातही मराठी शब्द चुकूनच ऐकू येतो. नागपूर महानगरावर प्रथमपासून हिंदीचा पगडा आहे. त्यात बदल नाही. आता मुंबईप्रमाणे ठाणे, पालघर भागातही हिंदी भाषा मराठीची जागा घेऊ पाहत आहे. पुणे हे मराठी भाषेचे प्रमाण मानले जाणारे शहर; पण अलीकडे 'आयटी'मुळे पुण्यातही हिंदीचा चंचुप्रवेश होत आहे. मराठवाड्यात छ. संभाजीनगरसह काही भागांत हिंदी, उर्दूचा प्रादुर्भाव आहे. म्हणजे महाराष्ट्राच्या साधारणपणे २० ते २५ टक्के भागात, प्रदेशात दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर कमी होत चालला आहे. दैनंदिन संभाषणात मराठी नाही, तर मग त्या भागातील, प्रदेशातील दुकानावरचे फलक, जाहिरातीची होर्डिंग्ज ही हिंदी आणि इंग्रजीत असली, तरी नवल वाटण्याचे कारण नाही.एकेकाळी मराठी मासिके आणि नियतकालिके ही मराठी भाषा समृद्ध करणारी वाचकप्रिय साधने होती. आता त्यांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. दिवाळी वार्षिकातून त्याची काही चुणूक दिसते; पण अशा वार्षिकांचा खपही पूर्वीच्या खपाच्या तुलनेत कमी झाल्याचे जाणवत आहे. विसाव्या शतकात अनेक अतिरथी, महारथी साहित्यिक, नाटककार, कवी आणि निबंधकारांनी सरस्वतीचा दरबार समृद्ध झाला होता. आता या दरबारात त्यांची उणीव भासत आहे. साहित्य क्षेत्राबरोबर मराठी चित्रसृष्टीने आणि रंगभूमीने यापूर्वी निर्माण केलेले मानदंड आता अपवाद वगळता दिसत नाहीत. मराठी भाषेच्या भरभराटीला जो घुणा लागला, त्याला अशी काही कारणे आहेत.देशातील प्रमुख २२ भाषांत मराठीचा क्रमांक तिसरा आहे. देशातील दहा टक्के लोक मराठी बोलतात; पण मराठी शब्दसंख्येची घसरण होत राहिली, तर आणखी काही वर्षांनी मराठीचे तिसरे स्थान दुसरी भाषा घेण्याची भीती आहे. काही वर्षांपूर्वी वृत्तपत्रे आणि नियतकालिके यामध्ये दर्जेदार मराठीचा वापर होत असे. प्रसंगानुसार चपखल म्हणी आणि वाक्प्रचारांचा उपयोग होत असे. आता प्रसिद्ध होणार्या मराठी बातम्यांत आणि लेखांत मराठी व्याकरणाचा अचूक वापर, अचूक मराठी शब्द यांची उणीव जाणवते, असा काही वेळा अनुभव येतो. महाविद्यालयात आणि विद्यापीठात मराठी विषय घेणारे विद्यार्थी दुर्मीळ होत आहेत.

## स्वारगेट अत्याचारकांडानंतर प्रशासनाला जाग; महामंडळात नेमणार IPS अधिकारी, बसेसमध्ये बसणार CCTV

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील एका बसमध्ये अत्याचाराची घटना घडल्यानंतर महामंडळाला सुरक्षेबाबत जाग आलीय. एसटी बस आणि एसटी आगाराच्या सुरक्षेबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महामंडळाला निर्देश दिले आहेत. महामंडळात आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे. आगारातील बंद पडलेल्या बसेस भंगारात काढले जाणार आहेत. एसटीच्या सुरक्षेसाठी एआयचा वापर केला जाणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिलीय.

स्वारगेटमधील बस आगारात मंगळवारी पहाटे एका २६ वर्षीय मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. आगारात उभी असलेल्या शिवशाही बसमध्ये दत्तात्रेय गाडे नावाच्या व्यक्तीने मुलीवर अत्याचार केला होता.

## अभंग मराठी

मराठी मराठी । असे माझी भाषा । हीच राजभाषा । महाराष्ट्री ।।
माझी मायबोली । आन, बान, शान । माझा अभिमान । रात्रंदिन ।।
भजन,कीर्तन । आणिक गायन श्रनवरस खाण । मायबोली ।।
माझा स्वाभिमान । आनंद निधान श्रनंदो चंद्र, सूर्य । आकाशात ।।
काना, मात्रा आणि । वेलांटी, उकार श्रभाषेस आकार । शब्द देती ।।
सुलभ,सरळ । ज्ञाना, तुका,एका । लिहिती अभंग । भाषेमाजी ।।
माझी मायबोली । प्रेमळ,रसाळ । असे लडिवाळ । वसे मुखी ।।
मराठीचा गर्व । ठेवा मनी सर्व । पुण्य काल पर्व । मराठीला ।।
जगावे मराठी । जगेन मराठी । साजरा हा करू । भाषा दिंन ।।



**प्रा. डॉ. शोभा गायकवाड**

# १०० शेळ्यांच्या शेळीपालनासाठी किती खर्च येईल, किती नफा होईल? वाचा सविस्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ कृषि**

देशातील विविध राज्यांमध्ये शेतीसोबतच बहुतेक ठिकाणी पशुपालनदेखील केले जाते. काही शेतकरी असे आहेत, जे जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी शेतीसोबत पशुपालन देखील करतात. पशुपालनात शेळीपालन हा सर्वात लोकप्रिय व्यवसाय आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शेळ्यांचाआकार आणि कोणत्याही हवामानात राहण्याची त्याची क्षमता. कमी जागेतही शेळ्या सहज पाळता येतात.

पशुपालनात शेळीपालन हा सर्वात लोकप्रिय व्यवसाय आहे. याचे मुख्य कारण म्हणजे प्राण्याचा लहान आकार आणि कोणत्याही हवामानात राहण्याची त्याची क्षमता. कमी जागेतही शेळ्या सहज पाळता येतात. अशा परिस्थितीत, १०० शेळ्या पाळण्यासाठी किती पैसे खर्च होतात आणि किती जमीन लागते, याबाबत जाणून घेऊयात....




**१०० शेळ्या वाढवण्याचा खर्च**

जर तुम्ही १०० शेळ्या एकत्र पाळण्याचा प्रयत्न करत असाल, तर त्याचे युनिट उभारण्याचा खर्च २० लाख रुपयांपर्यंत येतो. यावर शेतकऱ्याला ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १० लाख रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद देखील आहे. तथापि, तुम्ही कोणत्या राज्यात शेळीपालन करत आहात, यावर देखील ते अवलंबून आहे कारण अशा योजना राज्य सरकार चालवते. एकल शेतकरी योजनेअंतर्गत अर्ज करून शेळीपालनावर १० लाख रुपयांचे अनुदान मिळू शकते.

**तुम्ही सबसिडीचा लाभ घेऊ शकता**

जर तुम्हाला राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत ५० लाख रुपयांचे अनुदान मिळवायचे असेल तर तुम्हाला ५०० शेळ्या पाळाव्या लागतील. यासाठी तुम्हाला प्रकल्पात २५ बिजू शेळ्या देखील ठेवाव्या लागतील. ५०० शेळ्या आणि २५ बिजू शेळ्यांच्या संगोपनासाठी प्रकल्पाचा खर्च १ कोटी रुपये निश्चित करण्यात आला आहे. यावर तुम्ही ५० टक्के म्हणजेच ५० लाख रुपयांपर्यंत सबसिडी मिळवू शकता.


**शेळ्यांसाठी आवश्यक जागा**

जर तुम्हाला एका वेळी १०० शेळ्या पाळायच्या असतील तर त्यासाठी तुम्हाला खूप जागा लागेल. १०० शेळ्यांसाठी १००० चौरस फूट जागा आवश्यक असते. शेळ्या नैसर्गिकरित्या सक्रिय प्राणी असल्याने त्यांना बाहेर फिरण्यासाठी आणि चरण्यासाठी जागा आवश्यक असल्याने पुरेशी जागा उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. यामुळे गर्दी टाळण्यास मदत होते, ज्यामुळे ताण, आक्रमकता आणि रोगांचा प्रसार रोखता येतो. १००० चौरस फूट क्षेत्रात, शेळ्या मोकळ्या पद्धतीने वावरू शकतात.

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी** विशेष














## अरे व्वा! १० दिवस उपाशी पोटी खा 'तुळशीची पानं', होतील 'हे' जबरदस्त फायदे

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य**

आयुर्वेदात तुळशीला खूप महत्त्वाचं स्थान आहे. तिला औषधी वनस्पतींची राणी म्हणतात. तुळशीचा वापर वर्षानुवर्षे घरगुती उपचारांसाठी केला जात आहे. जर एखाद्याला खोकला असेल तर सर्वात आधी तुळशीची पानं खाल्ली जातात. अनेक आरोग्य समस्यांवर तुळस गुणकारी ठरते. जर तुम्ही १० दिवस उपाशी पोटी तुळशीची पानं खाल्लीत तर तुम्हाला अनेक जबरदस्त फायदे मिळू शकतात. दररोज उपाशी पोटी तुळशीची पानं खाल्ल्यानंतर तुमच्या शरीरात कोणते बदल होतात? याबद्दल जाणून घेऊया...

**तुळशीची पानं खाण्याचे फायदे**

तुळशीमध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. यामुळे सर्दी, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनचा धोका कमी होतो.

तुळशीमध्ये एंजाइम असतात जे पाचक रस एक्टिव्ह करतात. यामुळे गॅस, ॲसिडिटी, बद्धकोष्ठता, आंबट ढेकर यासारख्या पोटाच्या समस्यांपासून आराम मिळतो.

तुळशीची पानं खाल्ल्याने ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणात राहते. त्यामुळे इन्सुलिनची कार्यक्षमता वाढते.

चिंता आणि ताण कमी होते. त्यात एडेप्टोजेनिक गुणधर्म आहेत, जे मन शांत ठेवतात.

तुळशीची पानं खाल्ल्याने तुमचं हृदय निरोगी राहतं. कोलेस्टेरॉल कमी होतं, जे ब्लड प्रेशर नियंत्रित करते आणि त्यामुळे हृदयाच्या आरोग्यालाही फायदा होतो.

**कशी खायची तुळशीची पानं?**

दररोज सकाळी उपाशी पोटी ४ ते ५ तुळशीची पानं चावून खा. तुळशीचं पाणी प्या. यासाठी तुळशीची पानं रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी ते प्या. तुळशीचा चहा पिणं देखील फायदेशीर आहे.

## ग्रामपंचायतीला बदनाम करणे हे विरोधकांचं षडयंत्र : सतीश पाटील साखरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर**

मागील आठवड्यात ग्रामपंचायत माऊली धांडे येथील सरपंच सदस्यांसह ग्रामसचिवालाही कार्यालयात कोंडून बाहेरून कुलूप लावण्याचा प्रकार घडल्यानंतर या संबंधात आता विविध खुलासे होऊ लागले आहेत , आंदोलनकर्त्या व तक्रारकर त्या महिलेला सुद्धा घरकुल देण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे केवळ विरोधकांनी ग्रामपंचायतच्या विरोधात रचलेले हे षडयंत्र असल्याचे ग्रामपंचायत माऊली धांडे येथील उपसरपंच सतीश पाटील साखरे यांनी सांगितले आहे

ग्रामपंचायत माऊली धांडे येथे एकूण ६५० कुटुंबे वास्तव करतात त्यातील जवळपास ५५० लोकांना घरकुले वितरित करण्यात आल्याचे त्यांनी मुलाखतीत सांगितले आहे यासह आता केवळ ४९ लोकांची यादी शिल्लक असून त्यांनाही घरकुलाचा लाभ देण्यात येणार असून संबंधितांची यादी सुद्धा मंजूर झाली असल्याचे त्यांनी सांगितलं मागील आठवड्यात ४९ घरकुल लाभार्थ्याऐवजी ३६ लोकांना घरकुलाच्या बैठकीचे नोटीस देण्यात आल्याने हा गैरसमज निर्माण झाला होता याच गोष्टीचा विरोधकांनी फायदा उचलत ग्रामपंचायतला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

# महिला आर्थिक विकास मंडळाच्या साधन केंद्रातर्फे 'स्त्रीपुरुष समानता सुधारक सन्मान' सोहळा

## धामणगाव तालुक्यातील २४ गावातील दांपत्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ धामणगाव रेल्वे**

महिला आर्थिक विकास महामंडळ अमरावती द्वारा स्थापित भरारी लोकसंचालित साधन केंद्र धामणगाव रेल्वे अंतर्गत माविमच्या पन्नासाव्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महिला सक्षमीकरणकरिता संवेदनशील व गावपातळीवर महिलांच्या विकासा करीता पुढाकार घेत असलेल्या पुरुषांचा 'स्त्रीपुरुष समानता सुधारक सन्मान' सोहळा घेण्यात आला.

या सोहळ्याला सहाय्यक सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी

वैभव काळमेघ,संरक्षण अधिकारी सचिन असोडे श्री तिजारे,श्री कडू उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैभव काळमेघ यांनी केले. यामध्ये या कार्यक्रमाचा मुळ उद्देश म्हणजे गाव स्तरावर महिला सक्षमीकरण करीता गाव पातळीवर पूरक वातावरण तयार



होणे.घर दोघांचे अभियान राबवणे,घरावर पती पत्नीच्या नावाची पाटी लावणे,महिलाना सन्मान पूर्वक वागणूक देणे या विषयावर प्रास्ताविक व मार्गदर्शन केले.तसेच श्री आसोडे यांनी स्त्री पुरुष समानता कशाप्रकारे असायला पाहिजे.आपण या सर्व बाबीची स्वतः पासून सुरुवात करायला पाहिजे. यावर मार्गदर्शन केले.सुधारक सन्मान सोहळ्यांतर्गत २४ गावातील जोडप्याचा भेट वस्तू, श्रीफळ, देऊन सन्मान करण्यात आला. वर्धापन दिना निमित्त केक कापून सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला सी.एम.आर.सीच्या व्यवस्थापक स्वाती चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना गोमासे यांनी केले. सी.एम.आर.सीच्या रेखा गावंडे, वंदना बोंदाडे, पुष्पा खोब्रागडे, वनमाला मेश्राम यांनी सहकार्य केले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# राज्यातील ५०० मराठी शाळांना कुलूप

## दोन वर्षांत तीन लाख विद्यार्थी झाले कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

इंग्रजी शाळांच्या वाढत्या आकर्षणापुढे मराठी शाळांत शिकत असलेले विद्यार्थी कमी होऊ लागले आहेत. गेल्या दोन वर्षांत मराठी शाळांतील तब्बल तीन लाख विद्यार्थी कमी झाले आहेत, तर ५०० हून अधिक मराठी शाळा कमी झाल्या आहेत. त्या तुलनेत इंग्रजी माध्यमाच्या ३०० शाळा वाढल्या असून, तब्बल ६ लाख विद्यार्थी वाढले आहेत. इंग्रजी शाळांच्या वाढत्या आकर्षणापुढे राज्यातील खासगी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रस्थापित माय मराठी शाळांना उतरती



कळा लागली आहे, हे धक्कादायक वास्तव आहे.

राज्यात खासगी अनुदानित, विनाअनुदानित, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था अशा मिळून पहिली ते बारावीपर्यंत सर्व माध्यमांच्या तब्बल १ लाख ८ हजार शाळा आहेत. या शाळांत सुमारे २ कोटी ११ लाख विद्यार्थी शिकत आहेत. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात ८६ हजार १५७ शाळांमध्ये १ कोटी ३३ लाख १३ हजार ५०१ विद्यार्थी शिकत होते, तर १४ हजार ८१० इंग्रजी शाळांत ६० लाख ६२ हजार ७५० विद्यार्थी शिकत होते. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात २५९ शाळा कमी झाल्या आणि १ लाख ६८ हजार ६६४ विद्यार्थी कमी झाले आहेत, तर इंग्रजी शाळा १५ ने वाढल्या आहेत. मात्र, प्रवेश घेत असलेल्या विद्यार्थ्यांत वाढ झाली असून, २ लाख ८१ हजार ३६१ विद्यार्थी वाढल्याचे 'यूडायस'मधील आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

शैक्षणिक स्पर्धेत आपला पाल्य मागे राहू नये, या काळजीने पालक मराठी शाळांकडे पाठ फिरवत आहेत. मात्र, स्पर्धेत पाल्य मागे का आणि कशामुळे राहतो, याचा पालकांनीही अभ्यास न करता इंग्रजी शाळांत प्रवेश घेण्याकडे पालकांचा कल वाढताना दिसत आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून अनेक पालकांना इंग्रजी माध्यमाच्या शाळा खुणावू लागल्या आहेत. यंदाच्या वर्षात तब्बल २८७ शाळांची वाढ झाली असून, २ लाख ९४ हजार ९१३ विद्यार्थी वाढल्याचे दिसत आहे. शाळांची विद्यार्थी नोंदणी चालू असली, तरी हे आकडे फारसे कमी होणार नाहीत, असे दिसत आहे. शाळांवर मराठी भाषा शिकविण्याची सक्ती करण्यापेक्षा सरकारने मराठी माध्यमाच्या शाळा कमी न होता, या ठिकाणी विद्यार्थी कसे वाढतील आणि शाळा कशा सुधारतील, याकडे लक्ष दिले पाहिजे असा सूर आता उमटू लागला आहे.

# सुपर स्पेशालिटी शासकीय हॉस्पिटलच्या सेवा, सुविधा आता थेट नगरापर्यंत

## संत गाडगे बाबा विचार मंचचा स्तुत्य उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

कर्मयोगी संत गाडगे बाबा यांच्या जयंती निमित्त संत गाडगेबाबा विचार मंच सामाजिक संस्था व जिल्हा सामान्य रुग्णालय रुग्णालय अमरावती व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल) अमरावती सर्वज्ञ मल्टी सर्विसेस चे संचालक/गाडगेबाबा विचार मंच बहुउद्देशीय संस्थेचे कोषाध्यक्ष सचिन जी वरेकर व त्यांची संपूर्ण टीम यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणीचे व आधार कार्ड बनविणे यांचे आयोजन केले होते सदर शिबिराचे उद्घाटन माजी स्थायी समिती सभापती भाजपा शहर सरचिटणीस विवेक जी कलोती नगर विकास समिती सभापती व माजी नगरसेवक श्री. आशिषजी अतकरे ,सुधीरजी वाघ ,हेमंतजी श्रीवास यांच्या हस्ते करून तपासणी शिबिराला सुरुवात करण्यात आली. शिबिरामध्ये विशेष उपस्थिती म्हणून हृदयरोग तज्ञ डॉ. आदित्य गुप्ता यांनी संशयित हृदय रुग्णांची तपासणी केली. याशिवाय शिबिरामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब,कर्करोग लघवीशी संबंधित,आजार मूत्रपिंड




आजार प्लास्टिक सर्जरी, मेंदूशी संबंधित आजार, हृदयरोग बालरोग, इत्यादी तपासणी करून संशयित रुग्णांना सुपर स्पेशलिटी शासकीय रुग्णालय येथे पुढील निदान व उपचाराकरिता संदर्भित करण्यात आले. याचबरोबर हिंद रक्त तपासणी चमूद्वारा रक्त तपासण्या व नेत्र चिकीत्सा अधिकारी द्वारा नेत्र तपासणी करण्यात आली.सदर शिबिराकरिता सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती अंतर्गत डॉ. सपना गुप्ता वैद्यकीय अधिकारी एन.सी.डी. वैद्यकीय समुपदेशक डॉ. दिनेश हिवराळे , अधिपरिचारिका प्रतिभा सोळंके, अधीपरीचरिका माधुरी खवले, बहुउद्देशीय कर्मचारी पल्लवी ठाकूर, नेत्रचिकित्सा अधिकारी श्री यावले, श्री प्रथमेश गवई फार्मासिस्ट अब्दुल, बिलिंग क्लर्क श्री.भूपेंद्र जेवडे . हिंद परिचर मीना निशानदार, वाहन चालक दीपक शर्मा, प्रयोगशाळा रक्त चाचणी तपासणी चमू इत्यादी उपस्थित होते.

शिबीराचे उत्कृष्ट आयोजन नियोजन संत गाडगेबाबा विचार मंच बहुउद्देशीय सामाजिक संस्था वल्लभनगर नं - २ चे अध्यक्ष सचिन जी नींबोकार व इतर सर्व पदाधिकारी राम बावनकर ललिता बावनकर स्वाती नींबोकार प्रतीक कोंडे सचिन वरहेकर विजय आजनकर सुभाष आद्वारे दीपक काळे शिवदास सावरकर सोनू आद्वारे सुमन काळे वानखडे मोरे गौरव पापळकर व इतर सर्व नगरवासी यांचे सहकार्य लाभले.

# दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाला अपघातएकाचा मृत्यू, सहा जखमी पचमढीजवळील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अचलपूर**

महादेवाच्या दर्शनासाठी जात असलेल्या कविठा येथील भाविकांच्या चारचाकी वाहनाला विरुद्ध दिशेने आलेल्या वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात एकाचा मृत्यू झाला. तर अन्य सहा जण जखमी झाले. ही घटना मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११वाजताच्या सुमारास पचमढीजवळ घडली.

आशिष गोपाळराव बेलसरे (३५) रा. कविठा असे मृताचे नाव आहे. या अपघातात मुरलीधर सोनार (५५), संगम कविटकर (२७), रोशन अंबाडकर (३५), सौरभ सावरकर (२८), कुलदीप अंबाडकर (३५) सर्व रा. कविठा आणि चालक अमन मडघे रा. अचलपूर हे हे जखमी झाले आहेत. त्यापैकी संगम कविटकर, मुरलीधर सोलव आणि रोशन अंबाडकरयांच्यावर परतवाडा येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व भाविक सोमवार, २४ फेब्रुवारी रोजी कविठा येथून चारचाकी वाहनाने पचमढी येथे महादेवाचे दर्शन करण्यासाठी गेले होते. रात्र झाल्याने त्यांनी नंदिया या गावी मुक्काम केले. दुसऱ्या दिवशी ते पचमढी येथे पोहोचणार होते. महाशिवरात्रीच्या दिवशी महादेवाचे दर्शन घेऊन ते परतीच्या प्रवासाला निघणार होते. दरम्यान, पचमढी केवळ ५ किमी अंतरावर असताना विरुद्ध दिशेने आलेल्या वाहनाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात मधल्या सीटवर बसलेले आशिष बेलसरे यांचा मृत्यू झाला. अन्य भाविकांनाही गंभीर दुखापती झाल्या. तेथील पोलिसांनी त्यांना छिंदवाडा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. गंभीर जखमींवर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना गावी परत आणण्यात आले. त्यानंतर जखमींना परतवाडा येथील एका खासगी रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले.

# नझुल भूखंडधारकांच्या अभय योजनेला एक वर्ष मुदतवाढ

## वर्ग दोनच्या जमिनी एकमध्ये देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७परतवाडा**

शासकीयभोगवटदार वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एकमध्ये रुपांतरित (फ्री होल्ड) करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यात सवलत देण्यात येत आहे. या अभय योजनेला पुन्हा ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या निर्णयामुळे अमरावती व नागपूर विभागातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

तत्कालीन मध्य प्रांत व बेरार भागात लागू असलेल्या कायद्यान्वये मोठ्याप्रमाणात नझुल/शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आल्या होत्या. यामधील बहुतांश जमिनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी उक्त महसूल विभागात त्यावेळी अधिनियमात असलेल्या तरतुदीनुसार देण्यात आल्या. त्यामुळे या जमिनीच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण त्यावेळी नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येते. या नझुल भूखंडधारकांना त्यांच्या भूखंडाचे मालकी हक्क देण्याबाबत राज्य शासनाने १६ मार्च २०२४ च्या जीआर अन्वये विशेष अभय योजना राबविण्यास मान्यता दिली आहे.कृषक, निवासी वाणिज्यीक किंवा औद्योगिक प्रयोजनसाठी दिलेल्या शासकीय जमिनीचे किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एकमध्ये रुपांतरण करण्यासाठी सवलतीचे अधिमूल्य भरण्याची मुदत २०२५ मध्ये संपणार होती. परंतु, आता शासनाने पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ दिल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.यासाठी विशेष मोहीम म्हणून उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांचे कार्यालयात शिबिर आयोजित करण्यात आले असून त्यात फेब्रुवारी ते १० मार्चपर्यंत रजि सकाळो ११ ते दुपारी २ या वेळेत प्रकरणे स्वीकारण्यात येणार आहे.

> अचलपूर-परतवाडा तसेच विदर्भातील सर्वच नागरिकांना आपल्या सत्ता प्रकार बी (भो. वर्ग-२) चे कोणतेही तारण करताना, खरेदी-विक्री करताना, बक्षीसपत्र करताना किंवा इतर कोणतेही व्यवहार करताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. नागरिकांनी या अभय योजनेचा फायदा घेऊन आपल्या भो. वर्ग-२ च्या जमिनी वर्ग एकमध्ये रुपांतरण करण्याकरिता या मोहिमेचा लाभ घ्यावा.
>
> **बळवंत अरखराव, उपविभागीय अधिकारी, अचलपूर.**

# ऊर्जा परिवर्तनासाठी महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीचा राष्ट्रीय पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात अंमलात येणाऱ्या ऊर्जा परिवर्तन योजनेतील विशेष कार्यासाठी महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे नवी दिल्ली येथे मंगळवारी आयोजित केलेल्या तेराव्या ग्रीन एनर्जी समिटमध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.



महावितरणला या प्रतिष्ठित परिषदेत 'स्टेट लेव्हल एक्सलन्स वॉर्ड इन एनर्जी ट्रान्झिशन' या गटात पुरस्कार मिळाला. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात राज्याचा ऊर्जा परिवर्तन आराखडा तयार करण्यात आला आहे. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणकडून ऊर्जा परिवर्तन योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

नवी दिल्ली येथील पुरस्कार सोहळ्यात महावितरणचे कार्यकारी संचालक (वितरण) दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंता संदीप पाटील, अधीक्षक अभियंता नीलकमल चौधरी आणि अधीक्षक अभियंता संजय वाघमारे यांनी पुरस्कार स्वीकारला. पुरस्कार सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाचे अध्यक्ष अनिलकुमार जैन उपस्थित होते. तसेच ज्युरी मंडळाचे प्रमुख माजी केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान उपस्थित होते.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची वाढती गरज ध्यानात घेऊन राज्याच्या ऊर्जा क्षमतेत पाच वर्षात ४५ हजार मेगावॅटने वाढ करण्यात येईल व ती ८१ हजार मेगावॅट होईल. ऊर्जा परिवर्तन योजनेनुसार महावितरणने नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. आगामी काळातील वापरासाठी करण्यात आलेल्या वीज खरेदी करारांमध्ये प्रामुख्याने हरित ऊर्जेचे करार आहेत. यामुळे २०३० मध्ये राज्याचा हरित ऊर्जा वापर सध्याच्या १३ टक्क्यांवरून वाढून ५२ टक्क्यांवर जाईल. यामुळे पर्यावरण रक्षणासोबतच वीजखरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. यामुळेच महावितरणने राज्य विद्युत आयोगासमोर वीजदर निश्चितीसाठी दाखल केलेल्या याचिकेत आगामी पाच वर्षात टप्प्याटप्प्याने विजेचे दर कमी करण्याची अनुमती मागितली आहे. तसेच महावितरणने उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्याचा प्रस्ताव मांडला आहे.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० या योजनेच्या अंतर्गत राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारून त्यावर कृषी फीडर चालविण्यात येणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होईल. राज्यात या योजनेची अंमलबजावणी गतीने सुरू आहे. आगामी वर्षामध्ये या योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व कृषी पंप सौर ऊर्जेवर म्हणजेच हरित ऊर्जेवर चालविण्यात येणार आहेत. या योजनेत १६ हजार मेगावॅटची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता विकसित करण्यात येत असून ऊर्जा परिवर्तनामध्ये या योजनेचा महत्त्वाचा वाटा आहे.

# उपराई येथील सरपंचासह सहकाऱ्यांवर हल्ला : खल्लार ठाण्यात १६ जणांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर**

घरकुल यादीत नाव न आल्याने उपराई येथील सरपंचावर गावातील एका समुदायाच्या १६ जणांनी हमला केला. ही घटना खल्लार पोलीस स्टेशन हद्दीतील उपराई येथे मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी आरोपींवर ॲट्रॉसिटीसह इतरही गुन्हे दाखल करण्यात आले.

अब्दुल सलमान जाबीर (५०) व इतर अशी आरोपींची नावे आहेत. सरपंच निरज प्रभाकर नागे (३५), सुमित भिमराव सुरवाडे (४०), सैय्यद अहमद अली (४६), हमीद अब्दुल जब्बार (५०) हे महीमापूर मार्गाने फिरायला जात होते. त्यावेळी अब्दुल सलमान जाबीर हा पाठीमागून आला व त्याने सरपंच निरज नागे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाण करीत असताना अब्दुल सलमान याने अन्य १५ साथीदारांना बोलावून गावातील शांतता भंग केली. तसेच सुजित सुरुवाडे यास जातीवाचक अश्लील शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सरपंच निरज नागे यांना दर्यापूर येथील उपजिल्हारुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले; मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती येथे हलविले. सदर घटनेची तक्रार फिर्यादी सुजित सुरवाडे यांनी खल्लार ठाण्यात दाखल केली असून, त्या तक्रारीवरुन् खल्लार ठाण्यात १६ जणाविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले. निरज नागे सरपंच झाल्यावर उपराई येथील ग्रामपंचायत कार्यालयात त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांची प्रतिमा लावली होती. त्यावरुन काही ग्रामपंचायत सदस्यांत नाराजी असल्याचे बोलल्या जात आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार रविंद्र बारड तपास करीत आहे.

गावात संचारबंदीसदृश स्थितीसदर घटनेमुळे उपराई गावात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खल्लार, दर्यापूर व अमरावती ग्रामीण पोलिसांचा चोख बंदोबस्त आहे. त्यामुळे गावात जणू संचारबंदीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकीतील 3 विद्यार्थ्यांची 'प्लॅनेट स्पार्क' मध्ये निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपले कौशल्य सिद्ध केले आहे. नुकत्याच झालेल्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये पुणे येथील नामांकित 'प्लॅनेट स्पार्क' कंपनीत महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यशस्वी निवडीमुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलने एक महत्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

प्लॅनेट स्पार्क ही एक मध्यस्थ तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म कंपनी आहे, जी केजी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसह कार्यरत व्यवसायिकांना इंग्रजी संप्रेषण, सार्वजनिक बोलणे, व्याकरण, सर्जनशील लेखन, वादविवाद, ब्लॉगिंग आणि इतर नवीन युग कौशल्यांवर ऑनलाइन वर्ग प्रदान करते. बदलत्या काळात डिजिटल शिक्षण क्षेत्रात आपली



ओळख निर्माण करणाऱ्या या कंपनीत विद्यार्थ्यांची निवड होणे हे संस्थेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अभिमानाची बाब आहे.

महाविद्यालयातील निवड झालेल्या सय्यद सुफियान, वैष्णवी जायले, अपेक्षा गडपायले यांना प्लॅनेट स्पार्क कंपनीकडून वार्षिक ६.६४ लाखांचे आकर्षक पॅकेज मिळाले आहे. हे पॅकेज विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि महाविद्यालयाच्या प्रशिक्षण पद्धतीचे फलित आहे. विद्यार्थ्यांनी कंपनीच्या विविध मुलाखतीच्या फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम निवडीत स्थान मिळवले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालयातील प्राध्यापक, प्लेसमेंट टीम आणि कुटुंबीयांना दिले आहे. त्यांनी सांगितले की, महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या तांत्रिक आणि व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षणामुळेच त्यांनी ही कामगिरी साध्य केली. मुलाखतीदरम्यान सादरीकरण कौशल्य, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास यांची मोठी मदत झाली.

या उल्लेखनीय यशाबद्दल पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मो. झूहेर, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, सीएसई विभागाचे विभाग प्रमुख डॉ विजय गडिचा, सिविल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एस.एस. सराफ, सिविल विभाग प्लेसमेंट को ऑर्डीनेटर प्रा.सुहास पवार, सीएसई विभाग प्लेसमेंट को ऑर्डीनेटर प्रा. प्रतीक यावले, प्रा. योगेश शेलोकार, प्रा. दीपक धनवाणी, यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सिमोरी येथील नवजात बालकाला संपूर्ण वैद्यकीय सेवा पुरवणार : मुख्य कार्यकारी अधिकारी यांची रुग्णालयात भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

मेळघाटातील सिमोरी येथील नवजात बालकाला जन्मजात हृदयरोग असल्याचे निदान झाले आहे. याबाबत बालकाला नागपूर येथील नेल्सन रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे. बालकावर पुढील उपचार करण्यासाठी पालकांच्या सहमतीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. आज जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचार घेत असलेल्या बालकाला भेट दिली.अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दि. ३ फेब्रुवारी रोजी फूलमती राजू दहिकर, वय २२ वर्ष, रा. सिमोरी यांची प्रसूती होवून मुलगा झाला. बाळाचे वजन ३.४ किलो होते. माता व बाळाची प्रकृती चांगली असल्याने त्यांना रुग्णालयातून दि. ६



फेब्रुवारी रोजी सुट्टी देण्यात आली. दरम्यान दि. ६ ते २२ फेब्रुवारी पर्यंत आरोग्य कर्मचारी आणि आशा यांच्याकडून गृहभेटी देण्यात आल्या. तसेच दि. १८ फेब्रुवारी रोजी रात्री बाळाला आजीने डम्बा दिला. ही बाब २३ फेब्रुवारी रोजी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली. याबाबत आरोग्य कर्मचाऱ्यांनी बाळाला रुग्णालयात नेण्याची सांगितले असता पालकांनी नकार दिला. त्यानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे बाळाला हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रात दि. २४ फेब्रुवारी रोजी तपासणी केल्यानंतर चुरणी ग्रामीण रुग्णालय येथे संदर्भीत करण्यात आले. तेथून अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करण्यात आले. त्यानंतर रात्री ११.३० वाजता अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात स्पेशल न्यू बॉर्न केअर यूनीट (विशेष नवजात शिशु देखभाल) मध्ये भरती करण्यात आले.बाळाची तपासणी केली असता त्याला जन्मजात हृदयरोग असल्याने बाळाचे ऑपरेशन करणे आवश्यक असल्याचे निदान झाले. त्यानुसार बालकाला नागपूर येथील नेल्सन रुग्णालयात संदर्भीत करण्याबाबत पालकांनी तयारी दर्शवली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांनी स्वतः रुग्णालयात बालकाला भेट देऊन पालकांची समजूत काढली. जन्मजात हृदयरोग असल्याने बालकाच्या जीवितास धोका होऊ शकतो, हे पटवून दिले. त्यामुळे ऑपरेशन करणे महत्वाचे असल्याचे सांगितले.

# एलसीबी पथकाकडून क्रिकेट सट्ट्यावर धाडी पाच बुकींवर गुन्हा दाखल

## 'एलसीबी'ची देवलापार, बुटीबोरी परिसरात कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नागपूर**

एलसीबी पथकाकडून क्रिकेट सट्ट्याव स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने देवलापार (ता. रामटेक) व बुटीबोरी (ता. नागपूर ग्रामीण) परिसरात सुरू असलेल्या क्रिकेट सट्टा अड्यांवर धाडी टाकल्या. यात त्यांनी पाच बुकींवर गुन्हा दाखल केला असून, त्यांच्याकडून एकूण १९ लाख ११ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

देवलापार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावरील एका धाब्याच्या शेजारी उभ्या असलेल्या कारमध्ये चॅम्पियन ट्रॉफी दरम्यानच्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यावर सट्टा स्वीकारला जात असल्याचे कळताच एलसीबीच्या पथकाने पाहणी केली. त्यांना एमएच-३१/ सीएस-९९७२ क्रमांकाच्या कारमध्ये काही जण सट्टी स्वीकारत असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी कारमधील अनिकेत गणेश पखिड्डे (२२), मिलिंद रमेश जयस्वाल (४०) दोघेही, रा. देवलापार, ता. रामटेक रितिक विनोद दिवटे (२३, रा. वडंबा, ता. रामटेक) आणि सोनू श्याममनोहर गुप्ता, रा. सावनेर या चौघांविरुद्ध देवलापार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्यांच्याकडून एकूण ८ लाख ४० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

एलसीबीच्या पथकाने दुसरी कारवाई बुटीबोरी एमआयडीसी परिसरात असलेल्या बालभारती मैदानात केली. या ठिकाणी पोलिसांना प्रवीण महाकुलकर (३२, रा. रिधोरा सातगाव, ता. नागपूर ग्रामीण) हा एमएच-४०/ सीएच-३३११ क्रमांकाच्या कारमध्ये बसून भारत-



पाकिस्तान दरम्यान खेळल्या गेलेल्या क्रिकेट सामन्यावर सट्टी स्वीकारत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे एलसीबीच्या पथकाने प्रवीणसोबतच सुरज राव, रा. बुटीबोरी, ता. नागपूर ग्रामीण या दोघांविरुद्ध बुटीबोरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला. त्यांच्याकडून १० लाख ६९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**बुकींची नवी शक्कल**

पूर्वी बुकी शहरातील खोली अथवा फार्म हाउस किंवा एखाद्या फ्लॅटमध्ये बसून, सट्टा स्वीकारायचे. त्या ठिकाणी पोलिसांना धाडी टाकणे सोपे जायचे. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी बुकी आता त्यांचा हा व्यवसाय कारमध्ये बसून करतात. ते त्यांच्या कार निर्जन स्थळी, महामार्गालगत उभ्या ठेवतात. कुणकुण लागताच पळून जातात. या प्रकारामुळे बुकींना पकडणे पोलिसांना थोडे कठीण जाते.

**९३ संशयितांना स्थानबद्ध करण्यात आले आहे**

नागपूर जिल्ह्यात क्रिकेट बेटिंगचे प्रमाण अलीकडे वाढले आहे. याला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी चॅम्पियन ट्रॉफीतील क्रिकेट सामाने सुरू होण्यापूर्वीच ९३ संशयित बुकींना स्थानबद्ध केले आहे.

**१९.११ लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

एलसीबीच्या पथकाने या दोन्ही धाडींमध्ये एकूण १९ लाख ११ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात देवलापारच्या कारवाईतील आठ लाखांची कार, ३० हजार रुपयांचे तीन मोबाइल फोन, १० हजार ७०० रुपये रोख अशा ८ लाख ४० हजार ७०० रुपये तसेच बुटीबोरीच्या कारवाईतील १० लाखांची कार, ६५ हजार रुपयांचे दोन मोबाइल फोन व ४,५०० रुपये रोख अशा १० लाख ६९ हजार ५०० रुपयांच्या मुद्देमालाचा समावेश आहे.

# सिप अबॅयकस अमरावती असामान्य मुलाच्या प्रतिगोगितामध्ये ऋचा खडसे व विहान खडसे यांचे प्रावीण्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

संपूर्ण महाराष्ट्र मध्ये सिप अबॅयकस चे वतीने मुलांना गणित चे पक्के ज्ञान व कोणतेही कॅल्क्युलेटर न वापरता एक अंकी पासून तर निरंतर अंकी पर्यंत गुणाकार, भागाकार, वजाबाकी ,अधिक व कंस व सर्व प्रकारचे गणित सोडविणे ह्या साठी सिप अबॅकस प्रसिद्ध असून अमरावती शहरात नुकतेच कॅम्प परीसरातील व साईनगर येथील शाखेच्या वतीने शुभ मंगल कार्यालय येथे लहान मुलांची प्रतियोगिता परीक्षा घेण्यात आल्या होत्या त्या परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय , तृतीय व चंपीयन असे पारितोषिक





देण्यात येणार होते त्या साठी त्यांनी परीक्षा झाल्या नंतर शुभ मंगल कार्यालय येथे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते ह्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सिप अबॅकस चे कॅम्प परिसरातील उत्कृष्ठ शिक्षका सौ उर्मिला राठी यांनी आयोजित केली होती तसेच कार्यक्रमामध्ये सिप चे प्रदीप सर यांनी उपस्थित राहून मुलांना मार्गदर्शन केले तसेच ह्या महत्वाच्या कार्यक्रमात बडनेरा मतदार संघाचे आमदार रवी भाऊ राणा यांनी मुलांना पारितोषिक दिले व सर्व सहभागी मुलांचे कौतुक केले आणि प्रथम क्रमांक मिळविणारी जी एम सी मध्ये कू.ऋचा रुपेश खडसे हिला पारितोषिक व बक्षीस देऊन आनंदाची थाप थोपटली व विहान रुपेश खडसे याने तृतीय क्रमांक पटकाविला मुळे त्याचे सुद्धा रवी राणा यांनी कौतुक केले ह्या कार्यक्रमात अमरावती शहराचे साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ .रुपेश खडसे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले व योग गुरू तेजस गोतरकर यांनी सूर्य नमस्कार करुन व्यायामाचे महत्व सांगितले तसेच ऍड सुयोग माथूरकर यांनी छान मार्गदर्शन केले व सर्व मुलांना अभ्यासात गणित तज्ञ होण्यास सिप अबॅकस आपल्या सोबत नेहमी असल्याचे सांगितले पालक यांनी कार्यक्रम पाहून आनंद व्यक्त केला

# मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी उर्दू शाळा व आपल्या दवाखान्याची केली तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

महानगर पालिका चे वतीने कार्यक्षेत्रात असलेल्या चपराशी पुरा येथील मनपा उर्दू शाळा व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे अचानक भेट शिल्पा नाईक अतिरिक्त आयुक्त मनपा यांनी दिली ह्या अचानक भेटी तपासणी मध्ये शाळेतील मुल मुली यांनी योग्य प्रकारे शिक्षण देण्यात येते का शिक्षक उपस्थित असतात का मुख्याध्यापक व्यवस्थित शाळेत निरीक्षण



करून घेतात का अश्या विविध माहिती जाणून घेण्यासाठी महानगर पालिकेचे शिक्षण अधिकारी प्रकाश मेश्राम यांनी शाळेत विद्यार्थी व शिक्षक व कर्मचारी यांची माहिती पुरवली. तसेच मुला मुलींनी शाळेत छान शिकावतात सर्व शिक्षक व कर्मचारी अभ्यास घेऊन कुटुंबासारखी वागणूक देतात तसेच घ्या भेटी मध्ये आरोग्य अधिकारी विशाल काळे मनपा अमरावती यानी हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे होत असलेल्या औषध उपचार बाबत माहिती दिली सोबतच दवाखान्यात सर्व तपासनी मोफत असल्याची खात्री केली व येथे डॉक्टर व कर्मचारी यांची विचारपूस करण्यात आली ह्या अचानक भेटी त शहराचे साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ रुपेश खडसे ,आपला दवाखाण्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ निलेश पाटील , फार्मसिस्ट , आरोग्य सेवक उपस्थित होते सर्व तपासणी केल्या नंतर अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी आनंद व्यक्त केला.

# श्री अवधूत महाराज परिवर्तन पॅनलचा एकतर्फी विजय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती जिल्ह्यात चांदुर रेल्वे तालुक्यातील सावंगा (विठोबा) येथील नि.चि.संपतराव गवई मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या. या संस्थेची सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी १३ सदस्या करिता सावंगा (विठोबा) येथे निवडून घेण्यात आली. या निवडणुकीत श्री अवधूत महाराज परिवर्तन पॅनलचे १३ ही सदस्य बहुमताने विजयी झालेत. सर्वसाधारण मतदारसंघातून ८ विजयी उमेदवार: आठवले सुनील दत्तोपंत, नितनवरे सुरेश प्रल्हादराव, मारबदे अरून श्रावण, मारबदे दिनकर पंढरी, मेश्राम विजय रामदास, मोहोड सतीश जयदेव, सहारे रामदास लक्ष्मण, सहारे राहुल त्र्यंबकराव, अनुसूचित जाती/जमाती प्रवर्ग मतदारसंघातून १ विजयी उमेदवार: रामटेके संजय वामण, विजा/भज प्रवर्ग मतदार संघातून १ विजयी उमेदवार: ठाकूर शामसिंग मोहनसिंग, इतर मागासवर्गीय मतदार संघातून १ विजयी उमेदवार: भोयर विनायक शिवचरण, महिला प्रवर्ग मतदार संघातून २ विजयी उमेदवार: नेमाडे आशा पुंजाराम, सोनोने वंदना अरुण बहुमताने विजयी झाले. या निवडणुकीत सावंगा (विठोबा),भानखेड बु,मोगरा,मांजरखेड,हातला येथील९५ पैकी६५ मतदारांनी हक्क बजावला असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर.आर.लारोकर यांनी काम पाहिले आहे.

# कुटुंबाच्या दोन गटांमध्ये हाणामारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

चांदूरबाजार तालुक्यातील ब्राम्हणवाडा थडी येथील घटनेमध्ये क्षुल्लक वादातून कुटुंबाच्या दोन गटांमध्ये प्रचंड हाणामारी झाली. त्यात दोन्ही गटांतील तिघे जखमी झालेत. परस्परविरुद्ध तक्रारीवरून ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

वर्षा अनिल ईखार (वय ३५, रा. ब्राम्हणवाडा थडी) या महिलेचा पती मजुरीचे पैसे मागण्याकरिता बाजार चौकात गेले होते. त्याच ठिकाणी संशयित गंगाधर रूपराव ईखार (वय ४९) याने



शिवीगाळ केली. पती घरी आल्यानंतर सुद्धा संशयिताने घरासमोर येऊन शिवीगाळ करण्यास सुरवात केली. १ संशयितासोबतचा वाद मिटविण्याकरिता वर्षा ईखार, मुलगा व मुलगी, असे तिघेही गेले असता संशयिताने महिलेच्या मुलीसह विशाल सातपुते या दोघांना काठीने मारहाण करून जखमी केले. महिलेच्या तक्रारीवरून संशयित गंगाधर ईखारविरुद्ध ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

परस्परविरुद्ध बाजूने गंगाधर रूपराव इखार यांनी तक्रार दिली. त्यात ते बाजारचौकात भाजीपाला खरेदीसाठी गेले असता संशयित अनिल वामन ईखार (वय ४७), वर्षा अनिल ईखार (वय ३५) व विशाल सातपुते या तिघांनी काही कारण नसताना शिवीगाळ करून जबर मारहाण केली. संशयितांनी डोक्यात दगड घालून गंगाधर ईखार यांना जखमी केले. जखमीच्या तक्रारीवरून ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी संशयित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# बाजार समितीत तुरीची निव्वळ नोंदणी, तीस दिवसांची मुदतवाढ खरेदीचा मात्र पत्ता नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शासकीय तूर खरेदीचे भिजतघोंगडे कायम असताना नोंदणीसाठी महिनाभराची मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ २४ मार्चपर्यंत राहणार आहे. मात्र खरेदीचा प्रारंभ होत नसल्याने आर्थिक गरजेपोटी शेतकरी खासगी बाजारात तूर विकू लागल्याने या बाजारातील आवक वाढली आहे.

सोयाबीनप्रमाणे तुरीची हमीदराने शासकीय खरेदी



करण्याचे धोरण शासनाने लागू केले आहे. नाफेडच्या माध्यमातून ही खरेदी करण्यात येणार असून ती जिल्ह्याच्या एकूण सरासरी उत्पादनाच्या २५ टक्के प्रमाणात करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यात १ लाख १० हजार हेक्टर क्षेत्रात तुरीची पेरणी झाली आहे. कृषी विभागाने जिल्ह्याची सरासरी उत्पादकता हेक्टरी १३६० किलो इतकी काढली आहे. त्यानुसार १ लाख ५८ हजार ६१६ टन उत्पादनाचा अंदाज असून नाफेड त्यातील ३२ हजार ३८४ टन तूर हमीदराने खरेदी करणार आहे.त्यासाठी जिल्हा मार्केटिंगच्या आठ व व्हीसीएमएफच्या १२ केंद्रांवर२४ जानेवारीपासून नोंदणीचे आदेश काढण्यात आले. प्रत्यक्षात नोंदणी मात्र तीन फेब्रुवारीपासून सुरू झाली. २५ फेब्रुवारीपर्यंत म्हणजे मुदत संपताना जिल्ह्यातील ३ हजार ९५२ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. आता नोंदणीस तीस दिवसांची मुदतवाढ देण्यात आली असून २४ मार्चपर्यंत नोंदणीची प्रक्रिया चालणार आहे.

**खासगी बाजारातील आवकमध्ये वाढ**

शासकीय खरेदी प्रारंभ होत नसल्याने कंटाळलेल्या गरजवंत शेतकऱ्यांनी खासगी बाजारात तुरीची आवक वाढविली आहे. १ जानेवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत अमरावती बाजार समितीत तुरीची पावणेदोन लाख क्विंटलची आवक झाली आहे. हमीदरापेक्षा कमी दर मिळत असला तरी नगदी चुकारे मिळत असल्याने शेतकऱ्यांचा ओढा वाढला आहे. जानेवारीत ७हजार २४० व १८ फेब्रुवारीदरम्यान तुरीला सरासरी ७ हजार १६० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला आहे. गेल्या आठवड्यात या दरात थोडी सुधारणा झाली असून मंगळवारी (ता.२५) ७हजार ३३८ रुपये दर मिळाला.

# दोन रखवालदारांना धाक दाखवून लुटले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शहरात राजापेठ ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीच्या दोन घटना जुना बायपास, एमआयडीसी व वेदशीलानगर परिसरात घडल्या आहेत. दोन्ही ठिकाणी रखवालदारांना फटका बसला,

विनोद विठोबा नवले (वय ६०, रा. पार्टी, अमरावती) हे एमआयडीसी येथील प्लॉट क्रमांक ४५/४६ मध्ये रखवालदारीचे काम करतात. ते काम करीत असताना रात्री झोपले असता त्यांना शेजारच्या शेडमधून आवाज आल्याने रखवालदार नवले उठून बसले. चार जण रखवालदाराजवळ आले. त्यांनी नवले यांच्याकडील १४ हजार रुपयांचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला, असा आरोप विनोद नवले यांनी राजापेठ ठाण्यात दाखल तक्रारीत केला. त्या आधारे पोलिसांनी चारही पसार लुटारुंविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.राजापेठ हद्दीत रामदास घोडे साई हेरिटेजच्या मागे वेदशीलानगर येथे हबीब शेख शेख रमजान (वय ५५) हे रखवालदार म्हणून कार्यरत आहेत. ते रात्रीच्या वेळी झोपले असता वीस ते पंचवीस वर्षे वयोगटातील दोन अनोळखी व्यक्तींनी जवळ जाऊन चाकूचा धाक दाखविला. चार हजार रुपये किंमतीचा मोबाईल व लोखंड कापण्याची मशीन, असा एकूण चार हजार ७५० रुपयांचा ऐवज लुटून नेला. हबीव शेख यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण उपक्रमा अंतर्गत वडगाव फत्तेपुर विद्या मंदिर प्राथमिक शाळेत उत्कृष्ट परसबागची निर्मिती

## शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या स्तुत्य उपक्रमाला मिळाला जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार







**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ वडगाव फत्तेपुर**

केंद सरकारच्या प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण उपक्रमा अंतर्गत अमरावती जिल्ह्य़ातील अचलपूर तालुक्यातील वडगाव फत्तेपुर येथील विद्या मंदिर प्राथमिक शाळेत उत्कृष्ट परसबाग निर्माण करण्यात आली आहे.अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील स्वातंत्र्य पूर्व काळात १९३९ मधे स्थापन झालेली ही आहे वडगाव फत्तेपुर येथीलविद्या मंदिर प्राथमिक शाळा या शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शाळेत एक सुंदर अशी परसबाग तयार केली आहे ज्या परबागेचा जिल्ह्यातून प्रथम क्रमांक आलेला आहे.या परसबागेत अनेक प्रकारच्या पाले व फळभाज्या, वनौषधी वृक्षांची लागवड केली असून या सर्व भाज्या शाळेतील विद्यार्थ्यांना ताज्या पोषण आहारात दिल्या जात आहे.शिवाय शाळेतील विद्यार्थ्यांना परसबागेतील विविध जातीच्या वृक्षांची, पालेभाज्यां दररोजच्या आहारामधे असणारे पालेभाज्यांचे महत्त्व व उपयोग काय..या बाबतीत अवगत करण्यात येते.शाळेत विद्यार्थ्यांना सकस आहार मिळावा या हेतूने निर्माण केलेली ही परसबाग इतर शाळेसाठी प्रेरणादायी ठरली



आहे.अमरावती जिल्ह्यात प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण योजनेंतर्गत उत्कृष्ट परसबाग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यात या शाळेने जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.अनेक पालेभाज्या, वेलवर्गीय, मसालेवर्गीय आणि फळभाज्यानी बहरलेल्या विलोभनीय अशा या परसबागेत पालक,मेथी, चवळी, कोबी, लवकी, वांगे,काकडी, कारले, भेंडी, मिरची, घोळ ,कोथिंबीर, गवार ,बरबटि,कुयरी आणि वाल,शेवगा तर फळवर्गीय मधे आंबा चिक्कू पपई फणस सीताफळ डाळिंब पेरू केळी टरबूज सफरचंद द्राक्ष आणि स्ट्रॉबेरी इत्यादी तर मसालेवर्गीय मधे हिंग मिरे वेलची लवंग जिरे तेजपत्ता इत्यादीची लागवड केली आहे.वनौषधी वनस्पती मधे तुळस गवती चहा गोडलिंब लिंबू गुळवेलसत्व, लाल चंदन,शेंदूर आणि अंबाडी अशा प्रकारच्या एकूण जवळपास ११० विविध वृक्षांची या परसबागेत लागवड केली आहे.शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या या परसबागेतील ताजा भाजीपाला,फळे दैनंदिन लागणाऱ्या पोषण आहार मधे वापरला जातो. परसबाग टिकवण्यासाठी विद्यार्थी दररोज बागेला खत पाणी देऊन संगोपन करतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरणारी अशा प्रकारची प्रेरणादायी परसबाग सर्व शाळांमधे निर्माण झाली तर नक्कीच बालकांच्या शिक्षणाबरोबरच सुदृढ आरोग्याचा विचार करून आपल्याला उच्च शिक्षणाचे ध्येय पूर्ण करता येईल यात शंका नाही.



केंद्र सरकारची ही प्रधानमंत्री पोषण शक्ति निर्माण योजना अतिशय चांगली असून या माध्यमातून आजचा विद्यार्थी सुदृढ व बुद्धिमान होऊन कुपोषणा पासून निश्चितच मुक्त होईल असा विश्वास विद्या मंदिर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्रावण कावनपुरे यांनी व्यक्त केला आहे.



विद्या मंदिर प्राथमिक शाळेतील आकर्षित करणारी परसबाग बघून मन प्रसन्न झाले आणि नवीन प्रेरणा मिळाली असल्याचे परसबागेला भेट देणारे अंजनगावसुर्जी येथील शिताबाई संगई प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अनिल जूनघरे यांनी सांगितले.

**अनिल जूनघरे**
**मुख्याध्यापक शिताबाई संगई**
**प्राथमिक शाळा अंजनगावसुर्जी**

# नव्या शिक्षक निर्धारणामुळे जि.प. शाळांचे अस्तित्व धोक्यात

## शिक्षक संख्येवर गंडातर अमरावती जि.प.तील शिक्षक संख्या हजाराने घटणार : प्राथमिक शिक्षक समिती आंदोलनाच्या प्रविञ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

संचमान्यतेच्या नवीन धोरणानुसार महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आलेल्या शिक्षक निर्धारणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शिक्षक संख्या मोठ्या प्रमाणात कमी होणार असून एकट्या अमरावती जि.प. मधील शिक्षकांची संख्या हजाराच्या आसपास कमी होणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणाच्या हक्काचे केंद्र असणा-या जि. प. शाळांचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षक व पालकांच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण होत आहे.या विरोधात म.रा.प्राथमिक शिक्षक समिती आंदोलनाच्या प्रविञ्यात आहे.शासनाने हा निर्णय मागे घ्यावा या करीता शिक्षक समिती पदाधिकारी यांनी नुकतीत शिक्षणमंञी,शिक्षण राज्यमंञी,शिक्षण संचालक यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. सदर संचमान्यता गरिबांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता अन्यायकारक ठरणार असल्याने त्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती च्या वतीने राज्य शासनाकडे केली करण्यात आली आहे.

यापुर्वी इयत्ता ६ वी ते ८ वी ला ३६ विद्यार्थ्यांकरिता तीन शिक्षक मान्य होते. मात्र नवीन संचमान्यतेनुसार त्याकरिता ७८ पटसंख्या असणे आवश्यक आहे.ज्या शाळेत वर्ग ६ ते ८ मध्ये एकूण २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तेथे शून्य शिक्षक मान्य करण्यात आलेले आहेत. या विद्यार्थ्यांना आता दाखले घेऊन दुसऱ्या शाळेत जावे लागणार आहे. त्यामुळे राज्यात समाज शास्त्र व भाषा विषयाच्या पदवीधर शिक्षकांची हजारो पदे कमी होणार असून असंख्य शिक्षक अतिरीक्त ठरणार आहेत. नवीन संचमान्यतेनुसार भविष्यात बहुतेक शाळांमध्ये इयत्ता ६ ते ८ करिता दोनच शिक्षक राहणार असून त्यांच्यावर अतिरिक्त तासिकांचा भार वाढणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईलच सोबतच शालेय कामकाजावर विपरीत परिणाम झाल्यामुळे भविष्यात उच्च प्राथमिक चे वर्ग बंद पडण्याची शक्यता निर्माण होणार आहे. सन २००९ पुर्वी इयत्ता ५ ते ७ या तीन वर्गाला ४५ विद्यार्थ्यांना ४ शिक्षक शिकवत होते तेथे आता इयत्ता ६ ते ८ या तीन वर्गासाठी ७७ विद्यार्थ्यांना फक्त २ शिक्षक शिकवतील. इयत्ता १ली ते ५ वी च्या प्राथमिक वर्गावरील शिक्षक तसेच मुख्याध्यापकांची संख्या सुद्धा नवीन शिक्षक निर्धारणानुसार मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. एकूणच संचमान्यतेबाबत चे नवीन धोरण जि. प. शाळांना अन्यायकारक असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात जि. प. शाळा मोडकळीस येणार आहेत. परिणामी गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संधी हिरावल्या जाणार असल्याचे मत शिक्षक व पालकांकडून व्यक्त होत आहे. शासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा मोडकळीस येणार असून पर्यायाने गोरगरीब, दलीत व बहुजनांची मुले शिक्षणापासून वंचित ठरणार आहेत. त्यामुळे हा निर्णय बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमाचा भंग करणारा आहे.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने याबाबत राज्याचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. हा शासन निर्णय त्वरीत रद्द करावा अशी मागणी असून नव्या सरकारकडून तशी अपेक्षा आहे. अन्यथा या निर्णयाविरोधात राज्यभर आंदोलन उभारण्यात येईल.

**राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख**
**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# पाऊस अन् दक्षिण अफ्रिकेचं दुदैवी नाते; पावसामुळे ३ वेळा आयसीसी स्पर्धेतून बाहेर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दुबई**

दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघाला क्रिकेटमध्ये 'चोकर्स' म्हटले जाते. बाद फेरीत वारंवार बाहेर पडणे ही आफ्रिकन संघाची जुनी सवय आहे. दक्षिण आफ्रिका सध्या चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये ग्रुप बी च्या पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे, परंतु उपांत्य फेरीतील दक्षिण आफ्रिकेचे स्थान अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र काल ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्यामुळे उपांत्यफेरीत पोहचण्यासाठी दक्षिण अफ्रिकेला पुढील सामना काहीही करुन जिंकावा लागेल. पावसामुळे याआधी देखील दक्षिण आफ्रिकेला आयसीसी स्पर्धेतून बाहेर पडावे लागले होते

# विदर्भाचा स्वतंत्र मराठी वाययीन इतिहास १२ खंडांतून उपलब्ध होणार

## पहिल्यांदाच होत आहे प्रादेशिक संशोधन : वाचक, अभ्यासक, संशोधकांसाठी मोलाची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर**

अभिजात असलेल्या मराठी भाषेच्या एकूणच वाययीन इतिहासात विदर्भाचे योगदान कायमच अनुल्लेखित राहिले आहे. ही स्थिती दूर करण्यासाठी विदर्भातील साहित्यिक, मराठी अभ्यासक, संशोधकांनी मोठी धुरा खांद्यावर घेतली आहे. अगदी प्राचीन काळापासून ने आतापर्यंतचा विदर्भातील वाययीन इतिहास धुंडाळून तो १२ खंडांतून वाचकांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यातील ४ खंड हे पूर्णत्वाच्या तयारीत आहेत. हे खंड महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे प्रकाशित केले जाणार आहेत.

मराठी वाययाच्या समग्र इतिहास लेखनात महाराष्ट्रातील विविध विभागांच्या, विविध वायय प्रकारांच्या इतिहासाची दखल पुरेशी घेतली जाऊ शकलेली नाही. एखाद्या वायय प्रकाराचा प्रदेशनिहाय समग्र इतिहासाचा ग्रंथदेखील उपलब्ध नाही. त्यामुळे प्रादेशिक लेखन, लेखक, त्यांचे कार्य, कर्तृत्व, प्रादेशिक प्रतिभा यांचे उल्लेखदेखील मराठी वाययाच्या उपलब्ध इतिहासात वगळले गेले आहेत.इतिहासातून सुटुन जाणाऱ्या महत्त्वाच्या आणि उल्लेखनीय असूनही अनुल्लेखित राहणाऱ्या वैदर्भीय प्रतिभेचे दर्शन, वेगळ्या वाटा, प्रवाह, वळणे, प्रतिभा यावर भर असणाऱ्या नोंदीचे स्थानिक, प्रादेशिक वायय इतिहास लिहिले जाण्याची गरज आहे. त्या दृष्टीने 'मराठी वाययाचा वैदर्भीय इतिहास' हा एक प्रकल्प या प्रकल्पाचे संकल्पक आणि संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी हाती घेतला आहे. विदर्भातील सर्वच पिश्चांचे लेखक, लेखन, प्रवाह, दर्जा, गुणवत्ता, प्रभाव, परिणाम यांचे एकत्र असे प्रातिनिधिक दर्शन या प्रकल्पामुळे प्रथमच घडणार आहे. प्रत्येक वायय प्रकारात उल्लेखनीय असे काही सुटू नये आणि हे खंड सर्वसमावेशक व्हावे यासाठी लेखकांनी, वाचकांनी, अभ्यासक, संग्राहक, तसेच इतर सान्यांनी माहिती पुरवावी, असे आवाहन श्रीपाद जोशी यांनी केले.

### तीन कालखंडात विभागणी

विदर्भातील कविता, कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा, ललित गद्य, चरित्र-आत्मचरित्र, बालसाहित्य, वैचारिक/शास्त्रीय लेखन, सैद्धांतिक/तात्त्विक लेखन, अनुवादित साहित्य, लोकसाहित्य, भाषा अशा विविध प्रकारातील प्रत्येकी सुमारे २५० पृष्ठांचा एक खंड या प्रकल्पांतर्गत लिहून घेऊन ते खंड प्रकाशित केले आण्णार आहेत.

प्रत्येक खंडातील प्रत्येक प्रकारात प्राचीन काळापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत स्वातंत्र्यपूर्व कालखंड, १९४७ ते १९९० हा स्वातंत्र्योत्तर कालखंड व १९९० ते आजतागायत असा नव्वदोत्तरी कालखंड असा वाङ्मयाचा प्राचीन ते अद्ययावत इतिहास उपलब्ध करून दिला जाणार आहे.

खरे तर हे काम प्रत्येक विभागातील विभागीय साहित्य संस्थेने केशाय करणे आवश्यक होते, मात्र ते झालेले नसल्याने हा प्रकल्प हाती घ्यावा लागला आहे. वैदर्भीय मराठी वाडमयाचा इतिहास या निमित्ताने प्रथमच उपलब्ध होणार आहे.

**–श्रीपाद भालचंद्र जोशी**

# विशेष योजनेपूर्वी मालमत्ताकराचा व्याजासह भरणा करणाऱ्या ग्राहकांना मिळाला मोठा दिलासा : आ.सुलभा खोडके यांच्या सूचनेनंतर मनपा आयुक्तांनी राबविली प्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महानगर पालिका क्षेत्रातील वर्ष २०२३-२०२४ मधील थकीत मालमत्ताकरधारकांना व्याजच्या रकमेतून सूट देण्यासंदर्भात महापालिकेने विशेष योजना सुरु केली आहे. अशातच योजनेपूर्वी ज्या मालमत्ताधारकांनी थकबाकीच्या एकूण रकमेचा एकमुस्त भरणा केला आहे. त्यांना पुढील वर्षी आकारण्यात येणाऱ्या करातून शास्तीची रक्कम (व्याज) कपात मिळणार आहे. आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मागील २ जानेवारी २०२५ रोजी महापालिकेतील बैठकीमध्ये केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आता सर्व प्रक्रिया गतीने राबविण्यास सुरुवात केल्याने शहरातील मालमत्ताधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शासनाने अमरावती महापालिकेच्या वाढीव कर वसुलीला स्थगिती दिल्या नंतर जुनी कर प्रणाली नुसारच कर आकारणी व वसुली करण्याची कार्यवाही महापालिकेच्या वतीने सुरु आहे. मात्र मागील वर्षीच्या थकीत रक्कमेवर दरमहा २ टक्के व्याज आकारणी व वसुली होत असल्याने मालमत्ताधारकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. या संदर्भात अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी गेल्या ०२ जानेवारी २०२५ रोजी महापालिकेत बैठक घेऊन मालमत्ता कर आकारणी व वसुली प्रक्रियेबाबत मनपा आयुक्तांशी चर्चा केली. सन २०२३-२०२४ मध्ये मालमत्ताधारकांना कर भरण्यास पुरेसा कालावधी मिळाला नसल्याने



त्यांना थकीत रकमेवरील व्याजाच्या रकमेत सूट देण्यात यावी, तसेच ज्यांनी व्याजाच्या रकमेसह थकीत कराचा भरणा केलेला आहे. त्यांचे व्याजाची रक्कम पुढील चालू वर्षी करिता आकारणी करण्यात येणाऱ्या बिलाच्या रकमेतून कमी करण्यात यावी. अशा सूचना आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी बैठकीत केल्या होत्या. त्यानंतर मनपा आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि ड प्रकरण ८ नियम ४१ अन्वये महापालिका क्षेत्रातील मालमत्ताधारकांना थकीत करावर आकारण्यात आलेल्या (व्याज ) शास्तीच्या रक्कमेमधून सुट देणेकरीता विशेष योजना राबविली. ज्यामध्ये दिनांक ०५ फेब्रुवारी २०२५ पासून ते दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मालमत्ता कराची चालू वर्षाची मागणी,व थकबाकीच्या एकूण रकमेचा एकमुस्त भरणा करणाऱ्या मालमत्ताधारकांना थकीत रक्कमेवरील व्याजातून १०० टक्के सूट लागू करण्यात आली आहे. या योजनेला शहरातील मालमत्ताधारकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. त्यामुळे ग्राहकांनाही दिलासा मिळाला असून महापालिकेच्या उत्पनातही भर पडली आहे.वर्ष २०२३-२०२४ च्या थकीत मालमत्ताधारकांना करावरील व्याजातून सवलत देण्याचा प्रयत्न होत असतांना शहरातील अनेक ग्राहकांनी या विशेष योजनेच्या पूर्वीच मालमत्ताकराचा व्याजासह भरणा केला आहे. अशा शेकडो मालमत्ताधारकांना दिलासा मिळावा म्हणून पुढील चालू वर्षीची कर आकारणी करतांना त्यांनी वर्ष २०२३-२४ च्या थकीत करापोटी भरलेली व्याजाची रक्कम ही पुढील वर्षीच्या बिलाच्या रकमेतून कमी करण्याबाबत सुद्धा अमरावती महानगरपालिकेने कार्यवाही आरंभिली आहे. या संदर्भात मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी कर मूल्यांकन विभागाशी संबंधित सर्व अधिकारी, झोन अधिकारी यांची बैठक घेऊन मनपाच्या विशेष योजनेपूर्वी वर्ष २०२३-२४ चा थकीत मालमत्ताकराचा व्याजासह भरणा करणाऱ्या ग्राहकांना पुढील वर्षी आकारण्यात येणाऱ्या करातून शास्तीची रक्कम (व्याज) कपात करण्याबाबत सूचना निर्गमित करून याबाबत नियोजन करण्याचे आदेशित करण्यात आले.या बद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

